शिक्षण मंडळ पुणे महानगरपालिका
स्पेसिफीकेशन सन २००९–१०
निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक १८/०३/१०
दुपारी १ वाजेपर्यंत
संगणक पुरविणेबाबत
बयाणा रक्कम ७५,०००/–

शिक्षण मंडळ पुणे मनपाच्या प्राथमिक शाळांतील इ १ली ते ७ वीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण मंडळामार्फत संगणक प्रशिक्षण देण्यात येते. सदरच्या प्रशिक्षण वर्गासाठी आवश्यक संगणक पुरविणे कामी संगणकाचा रजिस्टर ट्रेडमार्क असलेल्या कंपनीच्या संगणक पुरविणाऱ्या पुरवठादार/कंपन्यांनी दोन पाकीट पध्दतीने निविदा भरावयाची आहे. नामांकित संगणक पुरवठा/उत्पादक कंपन्यांचे संगणक पुरविणेबाबतचे अधिकार व नामांकनाबाबतचे अधिकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल

खालील संगणकांचे दर देण्यात यावा एका पेक्षा अधिक दर देवू नये

| | | |
|---|---|---|
| 1 | Processor | Intel core 2 Duo E 7500 (2.93 GHz,1066 FSB,3MB L2) |
| 2 | MotherBoard | Intel G 43 chipset based motherboard |
| 3 | Memory | 2 GB DDR 3 RAM |
| 4 | Hard Disc Drive | 320 GB SATA – II HDD |
| 5 | Optical Drive | DVD-RW Drive |
| 6 | Graphics | Integrated AGP with at least 64 MB Shared Memory |
| 7 | Network | 10/100/1000 MBPS Ethernet on board |
| 8 | Ports | 6 USB ( with atleast 2 in front), 1 parallel, 1 serial, 2 PS2 |
| 9 | SMPS | 250 Watt or above |
| 10 | Cabinet | Micro ATX |
| 11 | Monitor | 18.5” wide LED monitor with same make as CPU |
| 12 | Mouse | PS2, 2 button scroll mouse with mouse pad |
| 13 | KeyBoard | PS2, 104 keys membrane keyboard |
| 14 | Warranty | 3 years comprehensive on site |

वरिल सर्व दर करासह दयावे. छापील किंमतीपेक्षा जास्त दरांचा विचार केला जाणार नाही. अधिकृत विक्रेता प्रमाणपत्र असल्याशिवाय पाकीट क्र २ उघडले जाणार नाही. संगणकांचे

शिक्षण मंडळ सांगतील त्या शाळेवर वाटप करावे लागेल. योग्य कारणावरून कोणतीही निविदा नाकारण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळाला राहील.

सदर या फॉर्ममध्ये काही सांख्यिकी किंवा नकळत टायपिंग चूक झाली असल्यास संबंधित भांडारपालांशी संपर्क साधून तपासून घ्यावेत.

| | |
|---|---|
| अध्यक्ष,<br>शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका | शिक्षण प्रमुख,<br>शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका |

## निवीदा अटीचा नमुना
## शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका
## शिवाजी नगर, पुणे ४११००५
## संगणक पुरविणेकामी निविदा अटी व शर्ती २००९—१०.

१.संदर्भः—

पुणे दैनिक प्रभात व दै. आज का आनंद दि.२४/०३/१० मधील प्रसिध्द झालेल्या जाहीर निविदा क्रं.२८.पुणे शिक्षण मंडळा मार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी संगणक प्रशिक्षणासाठी संगणक पुरविण्याचे कामी **विहीत नमुन्यातील निवीदा फॉर्म व निवीदा खालीलप्रमाणेः—**

शिक्षण मंडळ पुणे म.न.पा, पुणे व त्यांनी नियुक्त व अधिकृत केलेल्या **खरेदी समितीने** शैक्षणिक आर्थिक वर्ष २००९—१० चे करिता खालील **परिशिष्ठ अ** मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीस अनुसरून **परिशिष्ठ ब** मध्ये नमूद केलेल्या विशिष्ठ नामाकंन प्राप्त असलेल्या कंपनीच्या, **परिशिष्ठ क** मध्ये नमूद केलेल्या वेगवेगळया साईज मध्ये व त्या त्या एकूण संख्येमध्ये विशिष्ठ मुदतीत पुरवठयासाठी निवीदा अटी व शर्ती खालील प्रमाणे.

### परिशिष्ठ अ

### २. अटी व शर्ती :—

१.निवीदा सीलबंद असली पाहिजे. दिलेल्या मुदतीत व वेळेत निवीदा आली नाही तर ती स्विकारली जाणार नाही.

२.निविदेसाठी दोन लिफाफा पध्द्त असुन अ पाकीटमध्ये खालील साक्षांकित कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

**३.अ.पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे.**

**अ)** निवीदा रकमेच्या शेकडा १% या दराने बयाणा रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत बॅकेचा मा.शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा, पुणे यांचे नावे काढलेल्या धनाकर्ष (DD)जोडावा, २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयानुसार परिशिष्ट १२ अन्वये संबंधित लघुउद्योगाकडे अधिकृत पुरवठादार असल्याचे विकास आयुक्त, उद्योग व भांडार यांचे अधिकृत नोंदणी असल्याबाबतचे चालू वर्षाचे पत्र सोबत जोडले तरच निवीदादारास बयाणा रक्कम व अनामत रकमेमध्ये सुट मिळेल अन्यथा त्याला एस.एस.आय.युनिट असले तरीसुध्दा वरील रकमा भराव्या लागतील.

**ब)** निवीदादाराचे संस्था नोंदणी केलेले अद्ययावत प्रमाणपत्र.

**क)**आर्थिक वर्ष २००८–०९ मध्ये अद्ययावत व्हॅट भरल्याबाबतचा पुरावा तसेच मार्च २००९ अखेर व्हॅट क्लिअरन्स सर्टिफिकेट जोडावे.
**ड)**शासन, शासन अंगिकृत व इतर संस्थांना साहित्य पुरवल्या बाबतची अनुभवाची कागदपत्रे किंवा प्रमाणपत्र.
**इ)** निवीदादाराचे आयकर खात्याकडे नोंदणी केल्याचा नोंदणी प्रमाण पत्राची (Pan No.) छायांकित प्रत, तसेच मागील वर्षाचे इनकम टॅक्स रिटर्न प्रत.
**ई)** निवीदादार नोंदणीकृत सहकारी संस्था, नोंदणीकृत कपंनी किंवा नोंदणीकृत भागीदारी संस्था असेल तर संबंधित नोंदणी प्रमाणपत्र कार्यालयीन संचालकांची किंवा भागीदारांची पुर्ण नावे, वय, पत्ते व संस्थेचे नोंदणीकृत दाखल्याची प्रत, संस्थेने सहीचे अधिकार दिल्याबाबतचे पत्र तसेच निवीदादार शासन किंवा शाासन अंगिकृत संस्था असेल तर त्याबाबतची सर्व कागदपत्रे.
**ए)** व्यवसाय कर भरणा केलेले अद्ययावत चलनाची प्रत जोडणे आवश्यक
उ) निवीदादाराची निवीदा कामाची पुर्तता करण्यासंबंधिची आर्थिक क्षमता असल्याबाबतचे बॅकेचे प्रमाणपत्र निवीदेच्या एकूण किमतीच्या किमान २५ टक्के रकमेचे.
**ऐ)** अ पाकीटात सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती पाकीट उघडताना शिक्षण मंडळाचे कार्यालयास तपासणीचे कामी सादर करावी लागतील.
४.पाकीट ब मध्ये निविदा धारकाने परिशिष्ठ क मध्ये बाब निहाय सर्व करासह दर भरावेत व दोनही पाकीटे सिलबंद करून एका मोठया पाकीटात भरून त्या पाकीटावर निवीदा धारकाचे नाव, निवीदा क्रं.नमुद करून तो सिलबंद करून सादर करावा.
५.अ पाकीटमध्ये आवश्यक ती कागदपत्रे नसल्यास ब पाकीट उघडण्यात येणार नाही. याबाबत खरेदी समितीचा निर्णय अतिंम राहील.

६.**ब पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे.**
अ विहीत नमुन्यातील संगणकांचा तक्ता व त्याचे सर्व दर पत्रक, सर्व करासह.
७.**निवीदादाराने पुर्तता करावयाच्या अटी व शर्ती.**
१.निविदा स्वच्छ व स्पष्ट अक्षरात लिहिलेली असावी. संगणकाचा दर अंकी व अक्षरी लिहावेत.

२.निवीदा स्विकारण्याचा, नाकारण्याचा पुर्ण अगर अशंत: मंजुर करण्याचा सर्वस्वी अधिकार खरेदी समितीस आहे.

३.निविदाकरिता मंजूर व जाहीर केलेल्या रकमेत,संख्येत बदल करण्याचा अधिकार खरेदी समितीस आहे.

४.मान्य निवीदा धारकास निविदा दर स्विकृती मिळाल्यापासुन ७ दिवसाच्या आत शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमानुसार सर्वसाधारण मुद्रांकावर करार करणे बंधनकारक आहे.करार करण्यास निविदादाराने असर्मथता दर्शविल्यास बयाण रक्कम जप्त करण्यात येईल. प्रसंगी शिक्षण मंडळास सदर प्रक्रियेतुन काही नुकसान झाले असल्यास तीही रक्कम संबधितांकडून वसूल करण्यात येईल.

५.मान्य निवीदादारास करार करतेवेळी संगणक पुरवठयाच्या एकूण किंमतीच्या ५ % रक्कम सुरक्षा/अनामत रक्कम म्हणून शिक्षण मंडळाकडे धनाकर्ष (DD) ने भरावी लागेल.

६. निवीदेतील मान्य दर फक्त आर्थिक वर्ष २००९–१० करिताच करार केल्यापासून बंधन कारक राहतील.

७. बयाणा रक्कम व अनामत रक्कम पूर्णपणे एकमेकांपासून वेगळया आहेत. सदर रकमांवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

८.संगणक पुरविण्याकरिता करारनाम्यात दिलेली मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवून मिळणार नाही. सदर मुदत करारनाम्याची विशेष व महत्वाची अट राहिल. मात्र विशेष परिस्थितीत दिलेली मुदत वाढविण्याचा अधिकार मा. खरेदी समितीस राहिल.

९. दिलेल्या मुदतीत स्पेसिफिकेशन प्रमाणे संगणक न पुरविल्यास निविदादराची अनामत रक्कम जप्त केली जाईल. प्रसंगी निवीदादारास ब्लॅकलिस्ट करण्याचा अधिकार मा. खरेदी समितीस आहे व राहिल. वेळी व प्रसंगी नुकसान भरपाई मागणीचा अर्ज संबधित ठेकेदाराविरूध्द् लवादाकडे सादर केला जाईल व त्याच्या खर्चास व परिणामास संबंधितास जबाबदार धरले जाईल.

१०.करारनाम्यानुसार पुरवठा करावयाचे संगणक व संगणक प्रणाली मा.शिक्षण मंडळ कळविल त्या शाळांच्या मध्ये सर्वकरांसह स्वखर्चाने जकातीच्या रकमेसह पोहचविण्याची जबाबदारी निविदादारावर आहे.

११. करारनाम्यानुसार स्पेसिफिकेशननुसार मुदतीत संगणक न आल्यास **संगणक** स्विकारले जाणार नाही, न स्विकारलेले संगणक १० दिवसांच्या आत स्वखर्चाने संबंधित निविदादाराने त्या ठिकाणापासून स्वखर्चाने नेले पाहिजे ते न नेल्यास त्यास दररोज रू.१०००/– (अक्षरी रूपये एक हजार फक्त ) प्रमाणे

जागा भाडे आकारले जाईल व ३० दिवसांपेक्षा जास्त दिवस झाल्यास त्या मालाची जबाबदारी मा.शिक्षण मंडळावर राहणार नाही किंबहुना शिक्षण मंडळ संबधित नाकारलेल्या मालाची विल्हेवाट मनमानेल त्याप्रमाणे करेल.

१२.पुरवठा केलेले सर्व संगणक मोजून, तपासून घेवून दिलेल्या नमुन्या प्रमाणे सर्व संगणक असल्याची खात्री मा.खरेदी समितीस झाल्याशिवाय बिल मिळणार नाही.कोणत्याही स्वरूपात हप्त्याचे आगाऊ बिल मिळणार नाही. कोणासही ॲडव्हान्स रक्कमेची मागणी करता येणार नाही तसेच देय बिलातून आयकर कलम १९४ सी नुसार टीडीएसच्या रकमेची कपात केली जाईल.

१३.निविदादाराचे उत्पादक युनिटला करारनामा करण्यापूर्वी आवश्यकतेनुसार मा.खरेदी समिती/त्यांचे अधिकृत व्यक्ती भेट देईल त्याकामी निविदादाराने सर्व सहकार्य केले पाहिजे.

१४.एकदा भरलेली निवीदा रदद् करता येणार नाही एखादयाला ती जर रदद् करावयाची असेल तर त्याची संपूर्ण बयाणा रक्कम जप्त करण्याचा अधिकार खरेदी समितीस राहिल तसेच सदरची निविदा दुसऱ्या ठेकेदारास दिल्यानंतर बिलातील येणारा जादा फरक दंड म्हणून वसूल करण्यात येईल.

१५. मा.शिक्षण मंडळाने निविदेमध्ये नमुद केलेले काम मंजुर निविदादारास दिल्यानंतर इतर निविदादारांची बयाणा रक्कम चेकने परत दिली जाईल.त्यापूर्वी कोणासही बयाणा रक्कम भरल्याची मुळ पावती मागणी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१६. निविदादाराने संगणक पुरविण्यास तयार झालेले आहेत त्या संबधी पाहणी व तपासणी करण्याची विनंती खरेदी समितीस केली पाहिजे व तसे विनंती पत्र देणे आवश्यक आहे.

१७.संगणक पुरविण्याबाबत काही वाद निर्माण झाल्यास तो करारनाम्यानुसार लवादाचा विषय असेल व उभय पक्षाला संबधित वाद निर्णयाकरिता लवादाकडेच पाठवावा लागेल.

१८.निविदा एकास/अनेकास देणे किंवा विभागून देण्याचा अधिकार खरेदी समितीस आहे.

१९.संगणक सांगितलेल्या शाळेत पुरविल्यानंतर त्याची खरेदी समितीकडून पाहणी करण्यात येईल.पुरविलेले संगणक विहित नमुन्यात आहेत किंवा नाहीत हे पाहिले जाईल खराब किंवा स्पेसिफिकेशन प्रमाणे नसलेले संगणक कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत.

२०.निविदादाराचे स्पेसिफिकेशन किंवा पुरविलेल्या संगणकांबाबत खरेदी समितीस काही शंका आली तर त्याची गुणवत्तेची तपासणी सक्षम तज्ञ अभियंत्याकडून करण्यात येईल.व त्याची खर्चाची सर्वस्वी जबाबदारी निविदादारावरच राहिल.

२१. मंजुर केलेल्या अधिकृत नमुन्याप्रमाणे व ठरवून दिलेल्या मुदतीत पुरवठा झाल्यानंतर पुरवठा केलेल्या संगणकांचे एकत्रित देयक मा.शिक्षण प्रमुख शिक्षण मंडळ पुणे म.न.पा.पुणे यांच्या नावे या कार्यालयात सादर करावे लागेल. शाळावार संगणकांचा पुरवठा करताना प्राप्त केलेली चलन्स संबधित शाळेच्या मा.मुख्याध्यापकाच्या स्वाक्षरी व शिक्यासह देयकासमवेत सादर करावी लागतील त्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत बिल देण्याबाबत कार्यवाही केली जाणार नाही.

२२. निविदा दिनांक १८/०३/१० रोजी दुपारी ३ वाजता उघडण्यात येतील. वेळी व त्याप्रसंगी ठेकेदार स्वत: किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील. प्रशासकीय कारणास्तव त्या दिवशी निविदा न उघडलयास निविदा उघडण्याचा नवीन दिनांक सहभागी निविदादारास दूरध्वनी वरुन कळविण्यात येईल. वेळी व त्याप्रसंगी निविदादारास हजर रहावे लागेल त्याकामी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२३. सदरची निविदा ही शैक्षणिक वर्ष २००९—१० साठी संगणक पुरविणेबाबत असल्याने अंतिम बील आर्थिक वर्ष २००९—१० मध्ये मिळेल तसेच याबाबत कोणतीही सबब चालणार नाही.

पुणे.
दिनांक:—

**अध्यक्ष**
**शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.**

**शिक्षण प्रमुख,**
**शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.**

————————————————————————————————————————

**प्रतिज्ञालेख**

मी,श्री.————————————————————————वय———वर्ष

व्यवसाय—धंदा,राहणार——————————————————————————

निविदादार सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,वरील निवीदेच्या,फॉर्म सोबतच्या अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असून त्या सर्व मला व माझ्या संस्थेला मान्य आहेत. त्यानुसारच निवीदा भरलेली आहे व निवीदासोबत मला अटी व शर्ती मान्य आहेत. म्हणून सदर प्रतिज्ञापत्रावर आज रोजी पुणे येथे सही करुन निवीदेसोबत दाखल करित आहे.

पुणे:—
दिनांक:—

पुरवठा धारकाची सही व शिक्का